MHHI030004422020

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | : | २४.०२.२०२० |
| खटला नोंदणी दिनांक | : | २४.०२.२०२० |
| खटला निकाल दिनांक | : | २०.०३.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०६ ०० २५ |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २०१/२०२०** **निशाणी क्र. ६४**

फॉर्म क्र. ३२

**भाग अ**

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१) प्रमाणे)

| | | |
|---|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ३) हिंगोली यांचे न्यायालयात<br>पिठासीन अधिकारी – श्रीमती स्मृती एस. पळसुले, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगोली.<br>(दिनांक – २०.०३.२०२६)<br>(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २०१/२०२०)** | | |
| | (प्रथम खबर अहवाल क्र. ३१०/२०१९, महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणे, पोलीस ठाणे, हिंगोली ग्रामीण) | |
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासन, मार्फत तपासीक अंमलदार, हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे, ता. जि. हिंगोली. |
| सादरकर्ता | | अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. जाधव. |
| आरोपी क्र. १ | | हरिदास बालाजी कन्हाळे,<br>वय – २८ वर्ष, धंदा – मजुरी, |
| आरोपी क्र. २ | | बालाजी दशरथ कन्हाळे,<br>वय – ३४ वर्ष, धंदा – मजुरी, |
| आरोपी क्र. ३ | | रामकिसन लिंबाजी कन्हाळे,<br>वय – ४० वर्ष, धंदा – मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र. ४ | | प्रकाश शंकर कुऱ्हे,<br>वय – ४५ वर्ष, धंदा – मजुरी, |
| आरोपी क्र. ५ | | तान्हाजी रामन कदम,<br>वय – ३८ वर्ष, धंदा – मजुरी, |
| आरोपी क्र. ६ | | रामू प्रल्हाद कऱ्हाळे,<br>वय – ५५ वर्ष, धंदा – मजुरी,<br>सर्व राहणार– डिग्रस क–हाळे, ता. जि. हिंगोली. |
| सादरकर्ता | | आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. डी. देशमुख, |

**भाग – ब**

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२) प्रमाणे)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २८.०८.२०१९ |
| गुन्हा दाखल दिनांक | २८.०८.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल दिनांक | २४.०२.२०२० |
| आरोपाचा तपशील निश्चीत केल्याचा दिनांक | २४.०२.२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२.०४.२०२३ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक | -- |
| निकालाचा दिनांक | २०.०३.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | -- |

**आरोपींचा तपशील**

| अ. क्र. | आरोपींचे नाव | अटकेचा दिनांक | जामिन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हरिदास बालाजी कऱ्हाळे | २९.०८.२०१९ | पोलीसांनी नोटीसवर सोडले | महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| २. | बालाजी दशरथ कऱ्हाळे | २९.०८.२०१९ | | | निर्दोष | -- | -- |
| ३. | रामकिसन लिंबाजी कऱ्हाळे | २९.०८.२०१९ | | | निर्दोष | -- | -- |
| ४. | प्रकाश शंकर कुऱ्हे | २९.०८.२०१९ | | | निर्दोष | -- | -- |
| ५. | तान्हाजी रामन कदम | २६.०९.२०१९ | | | निर्दोष | -- | -- |
| ६. | रामू प्रल्हाद कऱ्हाळे | २९.०९.२०१९ | | | निर्दोष | -- | -- |

## भाग 'क'

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद क्र. ४४(३) प्रमाणे)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष–

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| सा. क्र. १ | संदीप उत्तमराव जाधव | फिर्यादी |
| सा. क्र. २ | किशोर दत्तात्रय पोटे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा. क्र. ३ | धनंजय दादाराव कऱ्हाळे | जप्ती पंच साक्षीदार |
| सा. क्र. ४ | विनोद शेषेराव पांडे | जप्ती पंच साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास–

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास–

| सा. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयाच्या निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोगपक्ष –

| अ. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | सा. क्र. १, निशाणी क्र. ३३ | जप्ती पंचनाम्यावरील सही |
| ०२. | सा. क्र. २, निशाणी क्र. ३४ | जप्ती पंचनाम्यावरील सही |
| ०३. | सा. क्र. ४, निशाणी क्र. ५२ | जप्ती पंचनामा |
| ०४. | सा. क्र. ४, निशाणी क्र. ५३ | फिर्याद |
| ०५. | सा. क्र. ४, निशाणी क्र. ५४ | छापील फिर्याद |

ब. बचावपक्ष –

| अनु. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क. न्यायालयाने दिलेले निशाणी क्रमांक –

| अनु. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड. भौतिक वस्तु –

| अनु. क्र. | भौतिक वस्तुचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## – न्या य नि र्ण य –

## (आज दिनांक २०.०३.२०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणे खटला चालविण्यात आला.

२. प्रस्तुत प्रकरणात आरोपीं हजर झाल्यानंतर, माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक २४.०२.२०२० रोजी निशाणी क्र. १८ अन्वये महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणे आरोपींविरुद्ध आरोपाचा सार तयार करण्यात आला. आरोपाचा सार मातृभाषेत आरोपींना वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबुल केला नाही, म्हणुन खटला पुढे चालविण्यात आला.

३. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले.

४. अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी वकील श्री. आर. बी. जाधव व आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. व्ही. डी. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभिलेखावरील पुराव्यावरुन आणि दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले प्रश्न कारणमिमांसासहीत पुढिलप्रमाणे–

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक २८.०८.२०१९ रोजी, मौजे मौजे दिग्रस कराळे येथील आरोग्य उपकेंद्रासमोर सार्वजनिक ठिकाणी २३.०० वाजता आरोपी गोलाकार बसून, स्वतःच्या फायद्याकरता झन्ना मन्ना | |

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| | नावाचा जुगार खेळ खेळत असताना मिळून आले आणि महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणे अंतर्गत गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| **०२.** | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**विचाराधीन प्रश्न क्र. ०१ बाबत –**

**६.** प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी श्री. संदीप उत्तमराव जाधव, (अ.सा.क्र.४) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात, दिनांक २८.०८.२०१९ रोजी ते त्यांना गुप्त बातमी मिळाल्यावरुन दोन पंचांना सोबत घेउन २३.०० वाजेच्या सुमारास घटनास्थळी गेले तेथे त्यांना एकुण चार आरोपी मिळुन आले. सदर आरोपींना नाव गाव विचारुन, दोन पंचासमक्ष आरोपींची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातुन त्यांना नगदी २४८०/– जुगाराचे साहित्य व तीन मोबाईल आणि स्कूटी मिळुन आले. त्यानंतर त्यांनी त्याबाबत दोन पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ५२) तयार केला. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात येउन आरोपींविरुध्द फिर्याद (निशाणी क्र. ५४) दिली, त्यावरुन प्रथम खबरी अहवाल (निशाणी क्र.५३ ) नोंदविण्यात आली. पुढील तपास श्री. चव्हाण यांनी केला, असे कथन केले आहे. फिर्यादी श्री. संदीप उत्तमराव जाधव, (अ.सा.क्र.१) यांच्या उलटतपासात असे आले आहे की, ते कोणत्या आरोपी कडून किती रक्कम जप्त केली सांगु शकत नाही. तसेच घटनास्थळ पंचनाम्यावरील निशाणी ५२ वरील कालावधीमध्ये खाडाखोड झालेली असून त्यावर त्यांची सही नाही हे त्यांनी मान्य केले आहे.

७. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार श्री. किशोर दत्तात्रय पोटे, (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात, दिनांक २८.०८.२०१९ रोजी ते व इतर कर्मचारी यांना गुप्त बातमी मिळाल्यावरुन ते घटनास्थळी गेले असता, तेथे त्यांना दोन एकुण चार आरोपी मिळुन आले. सदर आरोपींना नाव गाव विचारुन, फिर्यादीने दोन पंचासमक्ष आरोपींची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातुन त्यांना नगदी २४८०/– जुगाराचे साहित्य व तीन मोबाईल आणि स्कूटी मिळुन आले. त्यानंतर फिर्यादीने दोन पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा (निशाणी क्र.५२) तयार केला. त्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात येउन आरोपींविरुध्द फिर्याद, असे कथन केले आहे. सदर दोन्ही साक्षीदारांच्या उलटतपासात असे आले आहे की, ते जप्त नोटांचा क्रमांक सांगु शकत नाहीत. पंचांना घटनास्थळी हजर राहण्याबाबत लेखी नोटीस दिली नव्हती. अंतिम अहवालामध्ये सहा आरोपी कसे दाखवले हे ते सांगू शकत नाहीत. आरोपींतर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तर सुचक प्रश्नांना सदर साक्षीदारांनी नकारार्थी उत्तरे दिली.

८. जप्ती पंच साक्षीदार श्री. धनंजय दादाराव कऱ्हाळे (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार श्री. विनोद शेषेराव पांडे (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा केला नव्हता, काहीही जप्त केले नव्हते, ते शेतातुन घरी येत असतांना पोलीसांनी बोलावले व त्यांच्या सहया घेतल्या होत्या, असे कथन करुन अभिलेखावरील जप्ती पंचनाम्यावरील त्यांच्या सहया (निशाणी क्र. ३३ व ३४) ओळखल्या, परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नाही, असे कथन केले आहे.

९. पंच साक्षीदार श्री. धनंजय (अ.सा.क्र.१) आणि श्री. विनोद (अ.सा.क्र.२) यांनी अभियोगपक्षाला कोणताही पाठिंबा दिला नसल्याने विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४(१) प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यात अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर कोणताही फायदेशिर पुरावा आला नाही.

**१०.** अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, फिर्यादी श्री. संदिप जाधव, (अ.सा.क्र.४) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात, दिनांक २८.०१.२०१९ रोजी, आरोपींची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातुन त्यांना नगदी ८८९२०/– रुपये, मोबाईल व स्कुटी मिळुन आले. त्यानंतर त्यांनी त्याबाबत दोन पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ५२) तयार केला, असे कथन केले आहे. परंतु अभियोगपक्षाने तपासलेले जप्ती पंच साक्षीदार श्री. धनंजय (अ.सा.क्र.१) आणि श्री. विनोद (अ.सा.क्र.२) त्यांच्या साक्षीपुराव्यात, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष जप्ती पंचनामा केला नव्हता, काहीही जप्त केले नव्हते, असे कथन करुन अभियोगपक्षाला कोणताही पाठिंबा दिला नाही. त्यामुळे जप्ती पंचनाम्यावर संशय निर्माण होतो. तसेच अभियोगपक्षाने कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही.

**११.** वरील विवेचनावरुन अभियोगपक्षाच्या कथनानुसार दिनांक २८.०८.२०१९ रोजी, २३.०० वाजेच्या सुमारास, मौजे डिग्रस क–हाळे येथील आरोग्य उपकेंद्रावर आरोपी हे, स्वतःच्या फायदयाकरीता झन्नामन्ना नावाचा जुगाळ खेळ खेळत असतांना मिळुन आले, याबाबत वाजवी शंका निर्माण होत आहे. महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) ला लागु करण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जावून आरोपींविरुध्द सिध्द केले नाही. म्हणुन मी विचाराधीन प्रश्न क्र. १ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. ०२ बाबत</u> –**

**१२.** अभियोगपक्षाच्या एकूण साक्षीपुराव्यावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपींना संशयाचा फायदा देऊन त्याची प्रस्तुत गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, विचाराधीन प्रश्न क्र. ०२ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आ दे श

१) आरोपी क्र. १ हरीदास बालाजी क–हाळे, आरोपी क्र. २ बालाजी दशरथ क–हाळे, आरोपी क्र. ३ रामकिसन लिंबाजी क–हाळे, आरोपी क्र. ४ प्रकाश शंकर कु–हे, आरोपी क्र. ५ तान्हाजी रामन कदम आणि आरोपी क्र. ६ रामु प्रल्हाद क–हाळे, सर्व राहणार– डिग्रस क–हाळे, ता. जि. हिंगोली याची महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२ (अ) प्रमाणेच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे प्रस्तुत प्रकरणातील जामिन कदबे रद्द करण्यात येतात. आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.

३) कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरीता आरोपींनी सदर न्यायनिर्णयाचे विरुध्द अपील झाल्यास, अपील न्यायालयामध्ये हजर राहण्याकरीता प्रत्येकी रुपये १५,०००/ चे जामीनपत्र व वैयक्तिक जात मुचलके न्यायालयामध्ये दाखल करावे.

४) जप्त मुद्देमाल नगदी रुपये १०९२०/– हे कोणीही मागणी केली नसल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर शासन खाती जमा करण्यात यावे.

५) जप्त मुद्देमाल एक लॉनर कंपनीचा मोबाईल, हा दिनांक ०३.०१.२०२० रोजी सुपुर्तनाम्यावर अर्जदार बालाजी दशरथ क–हाळे यांना दिल्याचे दिसुन येते, अपिल कालावधी संपल्यानंतर सदरचा सुपुर्तनामा हा कायम करण्यात यावा.

६) जप्त मुद्देमाल एक होंडा कंपनीची ॲक्टीवा जिचा चेसीस क्र.

एमई४जेएफ५०५जीजीटी६१३८९८, ही दिनांक ३१.०८.२०१९ रोजी सुपुर्तनाम्यावर अर्जदार रामराव दशरथ क–हाळे यांना दिल्याचे दिसुन येते, अपिल कालावधी संपल्यानंतर सदरचा सुपुर्तनामा हा कायम करण्यात यावा.

७) जप्त मुद्देमाल एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल, कोणीही मागणी केली नाही, त्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर सदर मोबाईल जाहीर लिलाव करुन विक्री करुन आलेली रक्कम शासन जमा करण्यात यावी.

८) जप्त मुद्देमाल एक काब्रन–के–१ मोबाईल, कोणीही मागणी केली नाही, त्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर सदर मोबाईल जाहीर लिलाव करुन विक्री करुन आलेली रक्कम शासन जमा करण्यात यावी.

९) जप्त मुद्देमाल जुगाराचे ५२ पत्ते हे मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे.

SMRUTI SAGAR PALSULE
Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2026.03.20 18:05:04 +0530

दिनांक – २०.०३.२०२६
हिंगोली.

(स्मृती एस. पळसुले)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३ हिंगोली,